# ‘मेट्रो-३’ चा ३७वा टप्पा पूर्ण

**मुंबई :** कुलाबा ते सीप्झ या ‘मेट्रो ३’च्या हुतात्मा चौक ते सीएसएमटी पॅकेज १ मार्गाचे ९६ टक्के भुयारीकरण पूर्ण झाले आहे. एकूण ४१८ रिंगच्या साहाय्याने १०६ दिवसात या भुयारीकरणाचा ३७ वा टप्पा पार पडला. या भुयारीकरणासह ‘पॅकेज-१’ मधील कफ परेड ते सीएसएमटी दरम्यान एकूण २.९ किमी लांबीचे डाउन लाइनचे भुयारीकरण पूर्ण झाले आहे. **वृत्त...३**

# ‘मेट्रो ३’ चा ३७वा टप्पा पूर्ण

## कफ परेड ते सीएसएमटीदरम्यान २.९ किमी चे भुयारीकरण

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** कुलाबा ते सीप्झ या ‘मेट्रो ३’च्या हुतात्मा चौक ते सीएसएमटी पॅकेज १ मार्गाचे ९६ टक्के भुयारीकरण पूर्ण झाले आहे. एकूण ४१८ रिंगच्या साहाय्याने १०६ दिवसात या भुयारीकरणाचा ३७ वा टप्पा पार पडला. या भुयारीकरणासह ‘पॅकेज-१’ मधील कफ परेड ते सीएसएमटी दरम्यान एकूण २.९ किमी लांबीचे डाऊन लाइनचे भुयारीकरण पूर्ण झाले आहे, अशी माहिती मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनच्या (एमएमआरसीएल) अधिकाऱ्यांनी दिली.

कुलाबा ते सीप्झ दरम्यान अनेक ऐतिहासिक वारसा इमारती आहेत. या मेट्रो मार्गिकेजवळ समुद्र आहे. त्यामुळे त्याचे काम करणे जिकिरीचे होते. सूर्या २ या रॉबिन्स बनावटीच्या ड्युएल मोड हार्ड रोक टनेल बोअरिंग मशीनद्वारे हुतात्मा चौक ते सीएसएमटी हे भुयारीकरण पूर्ण करण्यात आले. यासह ‘मेट्रो ३’चे ९५ टक्के भुयारीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. ‘पॅकेज-१’ अंतर्गत कफ परेड, विधान भवन, चर्च गेट आणि हुतात्मा चौक या मेट्रो स्थानकांचा समावेश आहे.




कुलाबा ते सीप्झ या ‘मेट्रो ३’च्या हुतात्मा चौक ते सीएसएमटी पॅकेज १ मार्गाचे ९६ टक्के भुयारीकरण पूर्ण झाले आहे.

आतापर्यंत या पॅकेजअंतर्गत सहा भुयारीकरणाचे टप्पे पूर्ण झाले आहेत. त्यातील कफ परेड ते विधान भवन अप लाइनचे १२२८ मीटर, तर डाऊन लाइनचे १२५४ मीटर, तसेच विधान भवन ते चर्चगेट अप लाइनचे ४९८ मीटर आणि डाऊन लाइनचे ४८१ मीटर भुयारीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. तसेच चर्चगेट ते हुतात्मा चौक अप लाइन ६५४ मीटर आणि हुतात्मा चौक ते सीएसएमटीदरम्यानचे डाऊन लाइन ५६९ मीटरचे भुयारीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. उर्वरित कामही पुढील काही दिवसात पूर्वत्वास नेण्यात येणार आहे, असे एमएमआरसीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले.

दरम्यान ऐतिहासिक वारसा इमारती, त्याचबरोबर समुद्रानजीक भुयारीकरण करणे जिकिरीचे होते. ऐतिहासिक वारसा इमारती जवळून भुयारीकरण करताना सर्व सुरक्षेविषयी दक्षता घेऊन ‘पॅकेज-१’चे आतापर्यंत ९६ टक्के भुयारीकरण पूर्ण झाले, असे ‘एमएमआरसी’चे व्यवस्थापकीय संचालक रणजितसिंह देओल यांनी सांगितले.